www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार
मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३७ वार शुक्रवार दि. 31 जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याने आळी आंबिवली येथील नवीन विद्युत ट्रांसफार्मर चे काम मार्गी

**दैनिक युवक आधार**
**मोहपाडा/ वार्ताहर**

आळी आंबिवली येथील नवीन वसाहतीमध्ये कित्येक वर्षापासून विद्युत ट्रांसफार्मर बंद अवस्थेत होता या बंद असलेल्या विद्युत ट्रान्सफर मुळे एकाच ट्रान्सफरवर विद्युत भार पडत होता तसेचत् सुनील पवार घर ते मिलिंद कावडे यांच्या घरा पर्यंत विद्युत वाहण्याचे दोन फेस असल्यामुळे विद्युत पुरवठा अपुरा होत होता यामुळे वारंवार वीज खंडित होत होती आळी आंबिवली येथील ग्रामस्थ व स्थानिक नेते यांनी याबाबत महावितरण कंपनीस वारंवार विनंती अर्ज केले होते परंतु या ठिकाणी नवीन ट्रान्सफर बसवण्यात येत नव्हते अखेर भाजप शहराध्यक्ष चेतन जाधव व भाजप सहकारी कार्यकर्ते यांनीही बाब आमदार महेश बालदी यांच्या कानावर घातली त्याबाबत महावितरण आला आपल्या मार्फत निवेदन देण्यास आमदार यांनी शहराध्यक्ष चेतन जाधव व कार्यकर्त्यास सांगितले आमदार महेश बालदी यांनी तात्काळ महावितरणाच्या भिंगारी येथील अधिकारी राठोड यांना दूरध्वनीवरून संपर्क साधला की सदर ट्रान्सफरचे काम मार्गे लावण्यात यावे काही दिवसातच मोहपाडा महावितरणाचे उपअभियंता गलांडे यांनी या ठिकाणी भेट देऊन नवीन ट्रान्सफर बसवण्याचे काम हाती घेतले व ते पूर्ण पणे मार्गे लावले याबाबत ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी महावितरण व भाजप शहराध्यक्ष चेतन जाधव कार्यकर्ता त्यांचे आभार मानले आहे






**दैनिक युवक आधार -** जालना जिल्हातील घनसावंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर जाधव यांना दैनिक युवक आधारची 2025 ची दिनदर्शिका भेट देताना उपस्थित दैनिक युवक आधारचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री राजू शिंदे साहेब, दैनिक युवक आधारचे जालना जिल्हा प्रतिनिधी अशोक ठोके, दैनिक युवक आधार संभाजी नगरचे प्रतिनिधी ऋषिकेश सुरशे व घनसावंगी शहर प्रतिनिधी संभाजी नवघरे यांचं घेतलेलं छायाचित्र.




मौलाना अबुल कलाम आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार दैनिक दिव्य मराठीचे पाटोदा तालुका प्रतिनिधी अँड.महेश बेदरे यांना नुकताच जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरणाचा भव्य सोहळा बीड या ठिकाणी दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र व कार्यक्रमाचे निमंत्रण पाटोदा या ठिकाणी देताना. निवड समितीचे प्रमुख तथा दैनिक दिव्य वार्ताचे मुख्य संपादक श्री.अबूबकर साहेब व मान्यवर, या वेळी उपस्थित पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, ज्येष्ठ पत्रकार अब्दुल कादर मकराणी, ज्येष्ठ पत्रकार इद्रिस भाई चाऊस, पत्रकार हमीद पठाण, पत्रकार जावेद शेख, विधीज्ञ अँड.सचिन जावळे व इतर

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा)**

# “ संतांची फसवणूक झाली, सत्तेत राहायचा अधिकार नाही, योगींनी राजीनामा द्यावा”: शंकराचार्य

**प्रयागराज** येथे महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर मौनी अमावस्येच्या दिवशी अमृत स्नानासाठी कोट्यवधी भाविक आले. त्या ठिकाणी ब्रह्म मुहूर्तावर झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला असून ६० जण जखमी झाले. चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही याबाबत तीव्र संवेदना व्यक्त केल्या. परंतु, यावरून ज्योतिष पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी संताप व्यक्त करत योगी आदित्यनाथ यांच्यावर तिखट शब्दांत टीका केली आहे. स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले की, प्रयागराजमधील परम धर्म संसदेत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, असा ठराव मंजूर करण्यात आला आहे. हे लोक सत्तेत राहण्यास सक्षम नाहीत. जनतेपासून



माहिती लपवली आहे. संत समाजासोबत मोठी फसवणूक झाली आहे. एवढ्या मोठ्या चेंगराचेंगरीची माहिती मिळाल्यानंतर आम्ही शाही स्नान करणार नव्हतो, तेव्हा त्यांनी आम्हाला चुकीची माहिती दिली. त्यामुळे आम्ही मृतांना श्रद्धांजली न वाहता किंवा त्यांच्याबाबत मौन पाळून संवेदना व्यक्त न करता शाही स्नान केले. आमच्यापासून माहिती लपवण्यात आली हे खूप दुःखद आहे. मृत आणि जखमींचे आकडेही उशिरा देण्यात आले, परंतु आम्हाला योग्य माहिती देण्यात आली नाही. २०२७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत आम्ही नवीन लोकांना सत्तेत आणू. आगामी निवडणुकीत आपण नवीन पक्ष किंवा नवीन नेत्याना संधी देऊ. २०२७ च्या निवडणुकीत सध्याच्या सरकारला पाठिंबा देणार नाही, या शब्दांत शंकराचार्यांनी हल्लाबोल केला.

**योगी आदित्यनाथ यांना तत्काळ मुख्यमंत्रीपदावरून हटवावे**

शंकराचार्य पुढे म्हणाले की, जखमींचे आकडे जगभर प्रसारित केले जात होते, परंतु उत्तर प्रदेश प्रशासन आणि मुख्यमंत्र्यांनी सायंकाळी जाहीर केले. आम्हाला मृतांच्या आत्म्यांच्या शांतीसाठी मौन पाळण्याची संधीही मिळाली नाही. पंतप्रधान, गृहमंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनी योगी आदित्यनाथ यांना तत्काळ मुख्यमंत्रीपदावरून हटवावे. तरीही कोट्यवधी लोक इथे येणार आहेत, त्यांना गर्दी सांभाळता येत नाही, अशी टीका स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केली.

**१ हजार लोकांची व्यवस्था असेल तर तिथे ५ हजारांना आमंत्रित करायचे नसते**

मुख्यमंत्री योगी यांच्यासह सर्व सरकारी सोशल मीडिया अकाउंटवर घटनेची योग्य माहिती देण्याऐवजी लोकांना अफवांवर लक्ष देऊ नका, असे आवाहन केले जात होते. अशा परिस्थितीत अनेक धर्माचार्यांना या घटनेची माहिती मिळाली नाही. घटनेची माहिती योग्य वेळी मिळाली असती तर परंपरांचे पालन केले असते. महाकुंभमेळ्यातील तयारी अपूर्ण राहिली. लोकांच्या जीवाशी खेळण्यात आले. आपल्या घरच्या कोणत्याही कार्यक्रमात १ हजार लोकांची व्यवस्था असेल तर तिथे ५ हजार लोकांना आमंत्रित करायचे नसते. महाकुंभमेळ्यात हेच घडले. ४० कोटी भाविक महाकुंभमेळ्यात येणार असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असेल, तर तशी व्यापक सोय करायला हवी होती. परंतु, ते होताना दिसले नाही, असे सांगत शंकराचार्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

# रस्ता सुरक्षा अभियान 2025 अंतर्गत जनजागृतीसाठी

### न्हावा-शेवा वाहतूक नियंत्रण शाखेमार्फत चित्रकला स्पर्धाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

देशभरात राष्ट्रीय रस्ते सुरक्षा अभियान राबवण्यात येते त्याच पार्श्वभूमीवर उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली नावाच्या वाहतूक नियंत्रण शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या नेतृत्वाखाली "एम एम विद्यालयात पोलीस आयुक्तालय नवी मुंबई तर्फे आयोजित रस्ते सुरक्षा अभियान 2025 अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेत विदयार्थीनी बहूसंख्येने सहभागी झाले होते. या चित्रकला स्पर्धेच्या उद्देश वाहतूकी च्या नियमांचे पालन करण्यात यावे व विद्यार्थ्यांना वाहतूकीच्या नियमांचे पालन करावे या साठी या चित्रकला स्पर्धेच्या आयोजित करण्यात आले होते.या वेळी चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास त्यांचे सहकारी मयुर पाटील, किरण म्हात्रे, श्री ललित शिरसाट, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रणिता गोळे, पर्यवेक्षक श्री अरुण जोशी, सहाय्यक शिक्षक परेश पावसकर व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक अरुण जोशी सर यांनी केले. उपस्थित विद्यार्थ्यांना श्री. मुजावर साहेब यांनी रस्ता सुरक्षा बाबत अनमोल मार्गदर्शन केले.

## शिक्षक मित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलात कवी संमेलन संपन्न

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी रणिता ठाकूर
उरण रायगड

उरण ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुल आवरे येथे बुधवार दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी कोकण मराठी साहित्य परिषद आयोजित कवी संमेलन मोठया उत्साहात संपन्न झाले या कवी संमेलनात विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर कवींनी सहभाग घेतला मराठी साहित्याचा वारसा पुढे जोपासला जावा यासाठी कवींनी आपल्या कवितांच्या माध्यमातून प्रबोधन केले. कवी संमेलनात सेवानिवृत्त प्राचार्य ए. डी. पाटील, प्रा. एल. बी. पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, अजय शिवकर न.ग. पाटील व लवेश मोकल इत्यादी मान्यवर कवी उपस्थित होते. प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कवींनी विविध विषयावर तसेच आगरी बोली भाषेत कविता सादर केल्या, यावेळी शाळेतील विद्यार्थीनी माही भोसले, विद्या म्हामणकर, गौरी




थळी व निर्जल ठाकूर यांनी स्वरचित कविता सादर केल्या. तसेच शाळेतील शिक्षक विलास काटे व निवास गावंड यांनी आपली कविता सादर केली काव्य संमेलनाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विलास काटे तर आभार प्रदर्शन रोहिणी गोरे यांनी केले. कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



**दैनिक युवक आधार -** जालना जिल्यातील घनसावंगी पोलिस स्टेशनला दैनिक युवक आधारची 2025 ची दिनदर्शिका भेट देताना उपस्थित पोलिस स्टेशन चे कॉन्स्टेबल मोरे साहेब, दैनिक युवक आधारचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री राजू शिंदे साहेब, दैनिक युवक आधारचे जालना जिल्हा प्रतिनिधी अशोक ठोके, दैनिक युवक आधारचे संभाजी नगरचे प्रतिनिधी ऋषिकेश सुरशे व दैनिक युवक आधारचे घनसावंगी शहर प्रतिनिधी संभाजी नवघरे यांचं घेतलेलं छायाचित्र.

## केदार भगत यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी विद्यार्थ्यांना अन्नदान

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी:** भारतीय जनता पक्षाचे काम प्रामाणिकपणे करणारा कार्यकर्ता म्हणून ओळखला जाणारा केदार भगत यांचा वाढदिवस 600 आदिवासी विद्यार्थ्यांना अन्नदान करून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त केदार भगत यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले.याप्रसंगी भाजप नेते वाय. टी.देशमुख,टीआयपीलचे संचालक अमोघ ठाकूर यांनी देखील त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बोलताना लोकनेते मा.खा.रामशेठ ठाकूर म्हणाले की,केदार हा धडाडीचा आणि सर्वांच्या मदतीला धावून जाणारा कार्यकर्ता आहे.अतिशय मेहनतीने,जिद्दीने ते पक्ष कार्य करत असतात.त्यांनी हे कार्य असेच सुरू ठेवावे असे सांगून त्यांनी भगत यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यानंतर चिखले येथील आदिवासी आश्रम शाळेत 600 विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. त्या विद्यार्थ्यांसोबत केक कापून त्यांच्यासोबत भोजन देखील केदार भगत यांनी केले.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेह-यावर आनंद दिसून आला.त्यामुळे केदार भगत यांनी समाधान मिळाल्याचे सांगितले.यावेळी विशाल सावंत,सुमित दसवते, फिरोझ शेख, राजेंद्र भगत,नितेश भगत,रवी पारचे, संतोष वर्तले,चिन्मय भगत, चेतन म्हसकर,यज्ञेश पाटील,ब्रिजेश बहिरा, जयदीप भगत, संकेत दसवते, अभिषेक भालेकर, निहाल पाटील, शेषनाथ गायकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक विष्णू गायकर आदी उपस्थित होते.

# स्थानिक संस्थांच्या निवडणुका लांबल्या

### न्यायालयाने दिली २५ फेब्रुवारी तारीख, इच्छुकांच्या आशेवर पुन्हा पाणी

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

नवी दिल्ली: गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे मंगळवारी स्पष्ट झाले. या निवडणुकींच्या अनुषंगाने विविध दाखल याचिका एकत्रित करून सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीसाठी आता २५ फेब्रुवारी ही तारीख दिली. त्यामुळे या निवडणुकांच्या तयारीला लागलेले पक्ष आणि इच्छुक उमेदवार यांच्या आशेवर पुन्हा पाणी फेरले गेले आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठासमोर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी राज्य सरकारच्या वतीने बाजू मांडली. या विषयावर या प्रकरणातील कोणत्याही पक्षात मतभेद नाहीत. मी तासाभरात माझे मत मांडतो, अशी विनंती मेहता यांनी खंडपीठाला केली. तथापि, आज कोर्टाला जास्त वेळ नसल्यामुळे खंडपीठाने सुरुवातीला ५ फेब्रुवारी ही तारीख दिली. मात्र, त्याच दिवशी दिल्लीच्या विधानसभा निवडणुका असल्यामुळे २५ फेब्रुवारी ही तारीख देण्यात आली. ९२ नगरपालिकांत ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही हा मुद्दा पुढील सुनावणीत निकाली निघेल. त्यानंतर प्रशासक राज संपुष्टात येऊन निवडणुका होतील. यासंदर्भात पंजाब प्रकरणाचा दाखला आम्ही आजच्या सुनावणीवेळी दिला, अशी माहिती अ‍ॅड. देवदत्त पालोदकर यांनी दिली.

**आव्हान याचिकांमध्ये कोणते तीन मुद्दे महत्त्वाचे?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यांतील तरतुदींमध्ये झालेल्या बदलांना सर्वोच्च न्यायालयात विविध याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने पुढील तीन मुद्दे महत्वाचे आहेत.

१) प्रभाग रचनेचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाचा की राज्य शासनाचा?

२) महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची कमी केलेली सदस्य संख्या आणि

३) स्थगित केलेल्या २२ नगरपरिषदा आणि ४ नगरपंचायतीच्या निवडणुका नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या (ओबीसी) आरक्षणासह घेण्याबाबत.

**गेल्या सुनावणीवेळी न्यायालयात नेमके काय झाले ?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीच्या आत घेणे बंधनकारक असूनही वेळोवेळी निर्गमित अध्यादेश व कायद्यांमुळे निवडणुकीची प्रक्रिया रखडली आहे, असे अ‍ॅड. देवदत्त पालोदकर व अ‍ॅड. अभय अंतुरकर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. राज्याची बाजू मांडताना तुषार मेहता यांनी हे प्रकरण गुंतागुंतीचे झाले असून यात अनेक याचिका व अर्ज सादर करण्यात आल्याचे सांगितले. तेव्हा ओबीसी आरक्षण, प्रभाग रचना व राज्य शासनाचे अध्यादेश यासंदर्भात न्यायालयात सादर याचिकांमधील मुद्दे व न्यायालयाने पारित केलेले आदेश विचारात घेऊन याचिकाकर्ते, राज्यशासन व राज्य निवडणूक आयोगाच्या वकिलांनी एकत्रितपणे प्रकरणातील मुद्दे कायम करणे आवश्यक आहे, असे मत खंडपीठाने व्यक्त केले. त्यावर सर्व वकील सहमत झाले.

**कोणत्या कारणांमुळे रखडल्या आहेत निवडणुका?**

२०२१ मध्ये राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्य संख्येमध्ये वाढ केली. २३ महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा, २८४ पंचायत समित्या, २०७नगरपालिका तसेच १३ नगरपंचायतीची प्रभागरचना, आरक्षण तसेच मतदार यादीची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाने वाढीव सदस्य संख्येच्या आधारावरच पूर्ण केली होती.

मात्र, ४ ऑगस्ट २०२२ रोजी सदस्य संख्येतील वाढ व निवडणूक आयोगाची प्रभाग रचना, आरक्षण तसेच मतदार यादीची कार्यवाही राज्य शासनाने एका अधिसूचनेद्वारे रद्द केली होती. त्यामुळे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या.

# वैश्य गुरु वामनाश्रम स्वामींचे अनेकांनी घेतले दर्शन



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: वैश्य समाज बांधव पनवेल तालुका यांच्या वतीने काशी तथा हळदीपूर मठाधिपती वैश्य गुरु श्री श्री वामनाश्रम महास्वामी यांचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा खारघर सेक्टर ३४, क्रिश सेलेस्टिया बिल्डिंग येथील योगेश तांबोळी यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी वैश्य गुरु वामनाश्रम महास्वामींचे आशीर्वचन आणि दर्शन घेतले. सोमवार दिनांक 27 फेब्रुवारी रोजी सायंकाळी संत जनाबाई भजन मंडळ नेरे यांच्या भजनाचे आयोजन खारघर येथे करण्यात आले होते. त्यानंतर स्वामींचे आशीर्वचन आणि दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी दर्शनाला मोठ्या संख्येने वैश्य समाज बांधव उपस्थित होते. यावेळी वैश्य गुरु श्री श्री वामनाश्रम स्वामींनी सर्वांना आशीर्वाद दिले. यावेळी स्वामींनी प्रवचन देखील केले.

# यशवंत विद्यालय पालोद शाळेत ३१वर्षानंतर भरला वर्ग

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर**
**(ता.सिल्लोड):-** येथील यशवंत विद्यालय पालोद शैक्षणिक वर्ष १९९९ मधील ब्याचच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला.यावेळी तब्बल ३१ वर्षानंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्व शिक्षकांची उपस्थिती होती. एका व्हॉटअप ग्रुपद्वारे सर्वांना एकत्र आणत या एकजुटीचे रूपांतर भव्य स्नेहमेळाव्यात झाले. मुंबई, पुणे, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, आदी ठिकाणी अभियंता, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक, कृषी आदी क्षेत्रात माजी विद्यार्थी कर्तव्य पार पाडत आहे. अशा धकाधकीच्या जीवनामध्ये एकत्र येण्यासाठी शालेय जीवन अनुभवण्यासाठी पालोद येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी गुरुजनांचा सत्कार करण्यात आला व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन गणेश जाधव, कृष्णा काटकर व संतोष पंड्या यांनी केले विद्यार्थी आपल्या शालेय जीवनाविषयी भरभरून बोलले गुरुजनांनीही आशीर्वाद रुपी मंत्र विद्यार्थ्यांना दिला एक दिवसाच्या शाळेमुळे शाळेचा परिसर गजबजून गेला होता . सेवानिवृत्तीनंतर सुद्धा सर्व शिक्षक कार्यक्रमासाठी हजर होते. विशेष म्हणजे माजी विद्यार्थिनीची उपस्थिती लक्षणीय होती.



# सतरा वर्षीय मुलाला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
: 17 वर्षीय मुलाला हाताने मारहाण केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सतरा वर्षीय मुलगा हा आसुडगाव सेक्टर 5 येथे राहत असून उल्हास जावळे याने त्याला माझ्याकडे बघून का हसतो असे बोलला. यावेळी त्या मुलाने मी हसत नसल्याचे सांगितले. खोटं का बोलला असे बोलून त्याने या सतरा वर्षीय मुलाच्या गालावर 5 ते 6 वेळा चापट मारल्या.

================

# बांधकाम व्यावसायिकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
खरेदी केलेल्या रूमचे बांधकाम व्यावसायिकाने रजिस्ट्रेशन करून न देता त्या रूममध्ये दुसराच व्यक्ती राहत असल्याचे माहित झाल्यानंतर बांधकाम व्यावसायिक कल्पेश ज्ञानेश्वर कोनकर (राहणार चक्की नाका, कल्याण) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. शब्बीर हजारी दिन हे कल्याण, चक्की नाका येथे राहत असून त्यांनी कीमया बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्या चिंचवली तर्फे वाजे या ठिकाणी चाळीच्या प्रोजेक्टमध्ये 2020 मध्ये रूम नंबर एक बुक करून खरेदी केला. त्यासाठी कल्पेश कोनकर यांना साडेचार लाख रुपये चेक आणि रोख स्वरूपात दिले. रजिस्ट्रेशन करून देण्याबाबत विनंती केली असता नंतर बघू असे सांगून कोनकर यांनी टाळाटाळ केली. आणि रजिस्ट्रेशन करून दिले नाही. शब्बीर हे कल्याण येथे राहत असल्याने रूम मधील पेंटिंग आणि दरवाजाचे काम करून त्यांनी लॉक लावले होते. मे 2024 मध्ये रूमवर गेले असता त्या रूममध्ये एक इसम बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून राहत होता आणि त्यावेळी हा रूम मी खरेदी केला आहे असे त्यांनी सांगितले. या प्रकाराबाबत बांधकाम व्यवसायिक कल्पेश कोनकर यांना विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक कल्पेश कोनकर यांच्या विरोधात 25 जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

================

# घरफोडी प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वर्तव**
लाकडी कपाटाचे लॉकर उघडून लॉकरमध्ये ठेवलेले पाच लाख 75 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी चोराविरोधात 24 जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुमती पॅराडाईज, करंजाडे, कोपर येथील विद्या म्हात्रे यांच्या घरात अनोळखी इसमाने प्रवेश केला. आणि अलमारीत ठेवलेल्या चावीने लाकडी कपाटाचे लॉकर उघडले आणि लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचा हार, अंगठी, ब्रेसलेट असे पाच लाख 75 हजाराचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

================

# औषध पाजून पत्नीला ठार मारण्याचा केला प्रयत्न

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
पत्नीला औषध पाजून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पती नागेश वीरप्पा सुतार (राहणार नांदगाव) यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रतीक्षा राठोड या नांदगाव येथील चाळीमध्ये राहत असून त्यांच्या पतीसोबत नेहमी भांडण होत आहेत. 18 जानेवारी रोजी त्या आयजीपीएल कंपनी तळोजा येथून कामावरून संध्याकाळी सुटल्यानंतर तीचे पती नागेश यांच्यासोबत भांडण झाले आणि त्यांनी तिला मारहाण केली. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर 21 जानेवारी रोजी पुन्हा त्यांचे पती कंपनी जवळ आले आणि त्यावेळेस नांदगाव येथे राहण्यास चल, तुला घटस्फोट द्यायचा नाही असे ते बोलले. पत्नीने नकार दिल्याने केस पकडून मारण्यास सुरुवात केली. त्यानंतर जबरदस्तीने गाडीवर बसवून पनवेल येथील मिरची गल्ली बाजारपेठ येथे आणले आणि एका दुकानातून पांढऱ्या रंगाची बाटली घेतली आणि गाडीवर बसून नांदगाव डोंगरावर घेऊन गेला. यावेळी दोघांमध्ये वाद चालू होते. विकत घेतलेल्या बाटलीमधील औषध पिऊन दोघेही मरून जाऊ असे पतीने सांगितले असता त्याला प्रतीक्षाने नकार दिला. आणि तेथून निघून जात असताना तिचे केस पकडून तिला औषध पाजले. प्रतीक्षा तोंडातील औषध थुंकून पळु लागल्या. त्यावेळेस पुन्हा त्यांना पकडून बाटली तोंडाला लावली आणि औषध पाजले. प्रतिक्षाला त्रास होऊ लागल्याने पतीनेच तिला उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेले. त्यानंतर एमजीएम हॉस्पिटल वाशी येथे प्रथमोपचार करून एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे आणण्यात आले. 27 जानेवारी रोजी पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# हुतात्मा दिन स्वातंत्र लढ्यात प्राणांचे बलिदान दिलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**वसमत वार्ताहर**
**मुडी:** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुडी सर्वप्रथममहात्मा गांधीयांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आलीकार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मुख्याध्यापक गवळी सर होते प्रमुख पाहुणे मिलिंद आळणे गुरुनाथ गाडेकर समतादूत बार्टी होते.
भारतामध्ये दरवर्षी 30 जानेवारी रोजी हुतात्मा दिन पाळला जातो हा दिवस म्हणजे महात्मा गांधी यांची स्मृतिदिन होय राष्ट्रपित्याच्या पुण्यतिथीच्या स्मरणार्थ देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना या दिवशी आदरांजली अर्पण केली जाते नथुराम गोडसे ने 30 जानेवारी 1948 महात्मा गांधींची हत्या केली हा दिवस महात्मा गांधी यांची राष्ट्रभक्ती त्याग आणि त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाची आठवण करून देतो मात्र हा दिवस केवळ महात्मा गांधी यांची पुण्यतिथी नसून भारतासाठी बलिदान दिलेल्या सर्वात्म्यांची आठवण करून देणारा दिवस आहे म्हणूनच या दिवशी देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांच्या स्मृतीस वंदन केले जाते. याप्रसंगी आसवार सर थोरात मॅडम, गायकवाड मॅडम आभार प्रदर्शन थोरात मॅडम नी केले मोठया संख्येने विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.



# शिवसैनिकांचे चक्काजाम आंदोलन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर निकाळजे**
**वरूड (सर्कल)**
जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद येथे शिवसेना [उद्धव बाळासाहेब ठाकरे ] यांच्या कार्यकर्त्यांनी एस.टी. बसच्या भाडे विरोधात तालुक्यातील शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश पा गव्हाड व तालुका प्रमुख कुंडलिक पा मुट्ठे यांच्या प्रमुख उपस्थितीत एस.टी भाडेवाढ विरोधात छत्रपती शिवाजी महाराज चौक जाफराबाद येथे चक्का जाम आंदोलन करण्यात आले. यावेळी "जय भवानी,जय शिवराय" "उध्दव साहेब तुम अगे बाढो,हम तुम्हारे साथ है" शिवसेना जिंदाबाद अशा विविध घोषणा देत,एसटी बसच्या केलेल्या अ वाजवी भाडे वाढीच्या विरोधात सरकारचा जाहीर निषेध करत,सरकार विरोधात देखील विविध घोषणा देण्यात आल्या.

अगोदरच महागाईमुळे सामान्य व्यक्तीचे कंबरडे मोडले गेले असुन,जनता त्रस्त आहे.त्यातच शासनाने एसटी भाडे दरवाढ केल्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. व सामान्य कुंटूबातील व्यक्ती देखील ही जुलमी भाडे वाढ सहन करु



शकत नाही. त्यामुळे शासनाने हा निर्णय त्वरीत मागे घ्यावा अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा यावेळी देण्यात आला असुन, जनतेच्या भावना मा. तहसीलदार यांनी शासन दरबारी लवकरात लवकर पोहचावाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी उपस्थितांमध्ये उपजिल्हाप्रमुख रमेश पाटील गव्हाड,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, तालुका प्रमुख कुंडलिक पा मुट्ठे,माजी तुाकाध्यक्ष बजरंग बोरसे शिवाजीराव गावंदे, रमेश वाघमारे,शहरप्रमुख देवीसिंह बायस,माजी पं स सदस्य रमेश गायकवाड, तालुका युवा अधिकारी देविदास सवडे, जेष्ठ शिवसैनिक विष्णू पा म्हस्के, हरिश्चंद्र म्हस्के,शिवाजी म्हस्के,परमेश्वर सरोदे,विठ्ठल खपुटे रामेश्वर खांडेभराड, शेख इरफान, अश्पाक कुरेशी,मोहम्मद फैसल,समीर शहा, समाधान काकडे, बाबुराव मुळे,गणपत बनकर, प्रल्हाद बनकर,रवींद्र कदम, संतोष जाधव,एकनाथ परिहार अरुण काकडे, गोविंदा माकोडे,अमोल नरवडे,दिगंबर जाधव, विनायक जाधव सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते...

# शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुलात को. म.सा.प.चे कवी संमेलन संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर**
उरण तालुक्यातील आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुल आवरे येथे बुधवार दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी कोकण मराठी साहित्य परिषद आयोजित कवी संमेलन मोठया उत्साहात संपन्न झाले या कवी संमेलनात विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर कवींनी सहभाग घेतला मराठी साहित्याचा वारसा पुढे जोपासला जावा यासाठी कवींनी आपल्या कवितांच्या माध्यमातून प्रबोधन केले. कवी संमेलनात सेवानिवृत्त प्राचार्य ए. डी. पाटील, प्रा.एल.बी. पाटील, मच्छिंद्र म्हात्रे,रामचंद्र





म्हात्रे, अजय शिवकर,न.ग. पाटील व लवेश मोकल इत्यादी मान्यवर कवी उपस्थित होते. प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कवींनी विविध विषयावर तसेच आगरी बोली भाषेत कविता सादर केल्या, यावेळी शाळेतील विद्यार्थीनी माही भोसले, विद्या म्हामणकर, गौरी थळी व निर्जल ठाकूर यांनी स्वरचित कविता सादर केल्या. तसेच शाळेतील शिक्षक विलास काटे व निवास गावंड यांनी आपली कविता सादर केली काव्य संमेलनाला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विलास काटे तर आभार प्रदर्शन रोहिणी गोरे यांनी केले. कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शनिवारी नवीन पनवेलमध्ये गणेश मुर्ती स्थापना दिवस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
नवीन पनवेल येथील अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्रमंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी पीएल ५ नवीन पनवेल येथे माघी श्री गणेशोत्सव आयोजित करण्यात आला असून त्यानिमिताने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष के. डी. म्हात्रे, माजी नगराध्यक्षा स्मिता वाणी, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, तेजस कांडपिळे, समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, वर्षा नाईक, वृषाली वाघमारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. माघी श्री गणेशोत्सव निमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्री पालखी, भजन, सत्यनारायण महापूजा व महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी नगरसेविका सुशीला जगदीश घरत, पनवेल वैद्यकीय सेलच्या डॉ. अस्मिता घरत यांनी केले आहे.

# घाटकोपर येथील हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेड कंपनी मधील ११०० कामगारांच्या ३० वर्षांच्या प्रदिर्घ लढ्याला यश

## उद्धव ठाकरे यांच्या हस्ते थकित महागाई भत्ता धनादेशाचे वितरण

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज)**; घाटकोपरच्या हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेडमधील ११०० कामगारांना शिवसेनेने न्याय मिळवून दिला आहे.हिंदुस्थान कंपोजिट्स लिमिटेड कंपनी मधील ११०० कामगारांना ३० वर्षांच्या प्रदिर्घ लढ्यानंतर थकीत महागाई भत्ता (डीए) मिळाला.या महागाई भत्त्याचं वितरण मातोश्री येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते काही कामगारांना करण्यात आले.या वेळी शिवसेना नेते सुभाष देसाई,सचिव विनायक राऊत,मा. नगरसेवक/घाटकोपर पश्चिम विधानसभा समन्वयक शिवभक्त संजय भालेराव,आ.सुनील राऊत,मा.महापौर महादेव देवळे तसेच कामगार संघटनांचे नेते यावेळी उपस्थित होते व उर्वरित कामगारांना सायंकाळी घाटकोपर येथील एस.एन.डी.टी हॉल येथे महागाई भत्त्याचं वितरण करण्यात आले.





# राष्ट्रीय चर्मकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्षा सुवर्णा माने यांना सिंगापूर मध्ये शब्द विश्व मराठी साहित्य संमेलनात सन्मान,



**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**
श्री प्रसाद फाउंडेशनचे संस्थापिका, राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या पुणे जिल्हा महिला अध्यक्षा व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर सामाजिक न्याय विभाग महिला अध्यक्षा सुवर्णा आनंद माने यांना सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल सिंगापूर मध्ये नवव्या शब्द विश्व मराठी साहित्य संमेलनात संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या रझिया सुलताना व मॅक्स महाराष्ट्राचे संपादक मनोज भोयर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले होते यावेळी आयोजक शब्द परिवाराचे अध्यक्ष संजय सिंगलवार, शब्द परिवाराचे उपाध्यक्ष शशी डंबारे, मुंबई हायकोर्टाचे एडवोकेट सतीश बोलूरकर, प्रसिद्ध निवेदिका ज्योती भगत, आदि यावेळी उपस्थित होते

# जिल्हा परिषद रिटघर केद्रांचा बाल आनंद मेळावा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
रा.जि.प शाळा उसर्ली बुद्रुक येथे पार पडला या मध्ये उसर्ली बु ,रिटघर ,मोरबे,वाकडी,खानाव,चिंचवली,दुदंरे,दुदंरेपाडा,खैरवाडी,शिवणसई, बोंडारपाडा,अशा अकरा शाळा या बालआनंद मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या संपुर्ण उसर्ली गावातुन पालखी मिरवणुक काढण्यात आली त्या मिरवणुकीत प्रत्येक शाळेच्या विद्यार्थी विविध प्रकारचे वेश परिधान करून लेझीमच्या तालावर टाळमृदृगंच्या गजरात कोळीगीतांच्या तालावर ठेका धरून जवळ जवळ पाचशे विद्यार्थांसह चालीस शिक्षक वर्ग या मिरवणुकीत सहभागी झाले होते या कार्यक्रमाला ग्रामपंचायत उप सरपंच श्री प्रितेश डांगरकर माजी.सरपंच श्री शांताराम पोपेटा सदस्य श्री किरन डांगरकर सदस्या सौ रेश्मा पाटील पो. पा.श्री दिपक पाटील केद्रं प्रमुख श्री विनोद ठाकुर वाजे केद्रं प्रमुख श्री संदिप भोईर माजी शिक्षक श्री मंगळदास पाटील मा.शिक्षक श्री नीळकंट भुरे सर मा. शिक्षिका सौ भुरे मँडम रिटघर केद्रं शाळेचे मुख्याध्यापक श्री किशोर थळे सर मोरबे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ साळवी मँडम उसर्ली शाळेचे मुख्याध्यापक श्री जयवंत



पाटील वाकडी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मँडम खानाव शाळेच्या मुख्याध्यापिकासौ देशमुख मँडम दुदंरे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ डांगरे मँडम दुदंरेपाडा शाळेचे मुख्याध्यापक श्री मोरे सर चिंचवली शाळेचे मुख्याध्यापक श्री लव्हे सर खैरवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री सोनारघरे सर बोंडलपाडा शाळेचे मुख्याध्यापक श्री सफारा सर शिवणसई शाळेच्या मुख्याध्यापिका सौ कांबळे मँडम एस एम सी अध्यक्षा सौ चित्रा डांगरकर बचत गट सी.आर.पी.सौ सुजाता दळवी तसेच जादुगार श्री आशिष सातपुते सर, श्रीमती माने मँडम व गोरख माने सर, तसेच आजी माजी विद्यार्थी बचत गटातील महिला वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम पुर्ण दिवस चालल्याने सकाळी नाष्ता, भोजनाची व्यवस्था प्रितेश डांगरकर, संजय डांगरकर, बळीराम डांगरकर, दिपक पाटील, किरण डांगरकर यांच्या मार्फत देण्यास आली या कार्यक्रमेला आलेल्या मान्यवरांचे ग्रामस्थांचे पूष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री जीवन राठोड सर उसर्ली बुद्रुक यांनी केले

# असोळे येथील गवाळे कुटुंबाच्या घराला आग प्रचंड प्रमाणात झाले नुकसान

**दैनिक युवक आधार**
**कल्याण/रशीद शेख**
मुरबाड तालुक्यातील असोळे गावातील शंकर गवाळे, नामदेव गवाळे, रवी गवाळे यांच्या घराला बुधवारी दुपारच्या वेळी आग लागल्यामुळे त्यांच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आगीमध्ये मुलांचे शैक्षणिक कागदपत्र, घरातील साहित्य, कपडे ,फर्निचर भांडीकुंडी ,घराची लाकडे मुलांची शिक्षणाची वह्या, पुस्तके व इतर साहित्य मोठ्या प्रमाणात जळाले. त्यामुळे गवाले कुटुंबाच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. सदर आगीचा तलाठी यांनी पंचनामा केला असून शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी केली जात आहे. आमचे समाज सेवक भरत दळवी यांनी सदर ठिकाणी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व सदर कुटुंबाच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. सदर कुटुंबाला मदत करावी असे आवाहन करण्यात आले आहे.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# पहिली आंबा पेटी रायगडच्या हापूस आंब्याची; मुंबईत दाखल



**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नारंगी गावचे आंबा बागायतदार वरुण पाटील यांच्या रोहा वहार्टी येथील बागायतीमधील पहिला हापूस आणि केशर जातीच्या आंब्याच्या पहिल्या पेट्या मुंबई बाजारात मंगळवारी दाखल झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यात देखील हापूस आंब्याची गुणवत्ता व चव अप्रतिम असल्याने येथील आंब्याला मोठी मागणी आहे तरुण आंबा बागायदार वरुण पाटील हे बाजारात आंब्याची पहिली पेटी नेण्यात अग्रगण्य ठरले आहेत तब्बल ४५ एकर जागेवर त्यांनी आंबा बागायत केली असून वर्षभर केलेल्या मेहनतीचे गोड फळ त्यांना जानेवारी पासून मिळायला सुरुवात होते . कोकणच्या हापूस आंब्याचा रंग, सुंगधित वास आणि अवीट गोडी आणि चवदार भुरळ संपूर्ण जगातील खवय्यांना आहे.फळांचा राजा असलेल्या याच आंब्याची प्रतीक्षा आता संपली आहे खवय्यांना आनंदाची बातमी आहे.दरवर्षी आपल्या बागेतून किमान ४०हजार डझन आंबे ते बाजारात ते नेतात. यावर्षी पहिली आंबा पेटी बाजारात नेण्याचा बहुमान पुन्हा वरुण पाटील यांना मिळालाआहे. वरुण पाटील म्हणाले की यंदा पाऊस उशिरापर्यंत होता तरीदेखील जानेवारी मध्ये उत्पादन मिळाले यामागे खत व्यवस्थापन योग्यरीत्या केल्याने ते शक्य झाले आहे. बाजारात परराज्यातील आंबा हापूसच्या नावाने विकला जातो यामधे ग्राहकांची फसवणूक होते, त्यामुळे खात्रीशीर विक्रेत्याकडून आंबे घेणे , अथवा मानांकन तपासूनच आंबे खरेदी करणे ही पद्धती अवलंबुन व्यवहार करणे हिताचे ठरेल असे वरुण पाटील म्हणाले *पाच हजार रुपये डझन रायगडचा हापूस आता बाजारात भाव खाणार आहे. डझनाला पाच हजार रुपये दर मिळेल, अशी माहिती आंबा बागायतदार वरुण पाटील यांनी दिली आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही रायगडच्या हापूस आंब्याची पेटी बाजारात नेणारे वरुण पाटील पहिले मानकरी ठरले आहेत. बागायतीमधून काढलेल्या आंब्याच्या कुटुंबाने मनोभावे पूजा करून आंबा पेट्या बाजारात रवाना केल्या आहेत.

## सरगम संगीत अकॅडमी चा वर्धापन दिन सोहळा, शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल मधील कलाक्षेत्रातील सरगम संगीत अकॅडमीच्या ७ व्या वर्धापन दिन सोहळ्याला शेकापचे नेते प्रीतम जे एम म्हात्रे यांनी भेट दिली. शास्त्रीय रागांवर आधारित सुमधुर कार्यक्रम "राग एक-रंग अनेक" याची गाण्यांची खूप सुंदर मैफिल होती. अल्पावधीतच नरेश पाटील यांनी १०० पेक्षा जास्त कलाकारांमधील गायनाचे गुण ओळखून त्यांना एक सुमधुर गायक बनवून आपले चांगले शिष्य निर्माण केले आहे. यावेळी प्रितम म्हात्रे यांच्या सोबत संजीवनी जाधव (सुप्रसिद्ध सिने - नाट्य अभिनेत्री), गणेश पाटील (माजी उपनगराध्यक्ष पनवेल), प्रीती जॉर्ज (माजी नगरसेविका पनवेल), माधुरी गोसावी, करुणा ढोरे यांच्या सह समस्त विद्यार्थीवृंद उपस्थित होते.





**दैनिक युवक आधार** - करंजा मच्छीमार बंदराच्या दुसऱ्या टप्प्यातील कामे, मच्छिमारांना डिझेल परतावा तसेच डिझेल कोटा मंजूर करण्याबाबत राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी भेट घेतली, यावेळी उरण नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी,करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, राजेश नाखवा, कैलास कोळी ,महेंद्र कोळी,विलास नाखवा आदी उपस्थित होते. यावेळी या विषयावर सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच या संदर्भात बैठक घेण्याचे नामदार नितेश राणे यांनी आश्वासित केले.

# भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पालकमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन :- भाई विष्णुपंत घोलप

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**


भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड यांना शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप आणि इतरांनी विविध मागण्याचे निवदेन दिले. या मध्ये जातीय सलोखा अबाधीत राखण्यासाठी आपण भ्रष्ट पुढारी आणि जातीवादी नेते यांना लगाम घालणे बाबत., बालाघाटावर उज्वल भविष्य करण्यासाठी उंच अशा गहिनीनाथ गडाजवळ गोदावरी खोऱ्यातील पाणी टाकण्यासाठी मांजरा हे नवीन उपखोरे तयार करुन बीड जिल्ह्यासह अहिल्यानगर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील १८ ते २० तालुक्याला उपसा जलसिंचन योजना तयार करणे बाबत., बीड जिल्ह्यातील बालाघाटच्या कुशीत वसलेल्या परळी, अंबेजोगाई, धारुर, वडवणी, बीड, शिरुर, पाटोदा आणि आष्टी या तालुक्यातील डोंगराळ भागातील गावांचा पुर्नरसर्व्हे करुन डोंगरी विकास योजनेत समाविष्ठ करणे बाबत., २०२३ सालातील सतत पावसाच्या खंडामुळे आणि २०२४ सालातील सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे झालेले नुकसान त्यावर विमा कंपनीकडुन झालेल्या नुकसानीच्या किती टक्के विमा कोणकोणत्या पीकासाठी मंजुर केला तो अद्याप मिळाला नसले बाबत., विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमाफी घोषित केली होती त्याची अंमलबजावणी करणे बाबत, महाराष्ट्रात ग्राम पंचायतीच्या नगर पंचायती झाल्या त्या मुळे केंद्र आणि राज्याच्या कित्येक योजनेपासुन शेतकरी वंचित राहत असले बाबत. (त्या मध्ये कांदाचाळ, शेडनेट, कडबाकुट्टी, ठिबक व तुषार सिंचन, टॅक्टर व त्या वरील अनुदान मिळते परंतु जनसिंचन विहिर, गाई गोठा, पांदणरस्ते आणि इतर मिळत नसले बाबत), गेल्या कित्येक दिवसापासुन मांजरा नदीवर पाटोदा शहरालगत ता.पाटोदा जि.बीड येथील जलसंधारण विभागा अंतर्गत को.प.बं.क्र.११ ला विशेष बाब म्हणून शासनाने मंजुरी देणे बाबत., २०१५ साली पाटोदा येथे दुष्काळात काम मागण्यासाठी आलेल्या मोर्चेकऱ्यामधील ५० मजुरावर ३५३ आणि इतर कलमांतर्गत खोटे गुन्हे दाखल केले ते वापस घेऊ, केलेल्या कामाचे पैसे देऊ आणि मंजुर झालेला बेरोजगार भत्ता देऊ असे लेखी आश्वासन तत्कालीन रोहयो उपजिल्हाधिकारी यांनी दिले होते ते अद्याप पुर्ण केले नाही त्यामुळे ते रोहयो मजुर जिल्हा न्यायालयात गेल्या कित्येक वर्षापासून चकरा मारत आहेत त्यांना न्याय मिळवुन देणे बाबत., महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची शेतमाल तारण योजना कित्येक तालुक्याला गोडाऊन नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्या योजनेचा फायदा होत नसले बाबत., शासनाने खाद्यतेल, सोयापेंड (डीओसी) आयात केल्यामुळे गेल्या कित्येक दिवसापासुन हमी भावापेक्षा १०००/- रुपये कमी दराने सोयाबीन बाजारात विकल्या जात आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले असुन त्यांना भाव फरकाचे किमान क्विंटल मागे १०००/- रुपये भरपाई म्हणून देणे बाबत., पाटोदा पोलीस स्टेशनला नवीन जागा उपलब्ध करुन देणे आणि अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन निवासस्थानाची सोय करण्यात यावी. आणि इतर विषया संदर्भात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत लेखी निवदेन देण्यात आले. आणि माहितीस्तव बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग बप्पा सोनवणे व भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी दिले आहे. या वेळी शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, भाई बाळासाहेब घुमरे, भाई राजु शेख, भाई राजेंद्र नवले, भाई इमरान शेख, भाई अभि लोंढे सह इतरांची उपस्थिती होती.

## राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण,दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्हा पालकमंत्री मा.ना. अतुलजी सावे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** या बैठकीस जिल्हाधिकारी तथा नांदेड जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव अभिजीत राऊत, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खा.अशोकराव चव्हाण साहेब, राज्यसभा सदस्य खा.डॉ.अजित गोरछडे, खा. रविंद्र चव्हाण,मा. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, विधान परिषदेचे सदस्य हेमंत पाटील, आ.भीमराव केराम, आ.डॉ. तुषार राठोड, आ.जितेश अंतापुरकर, आ.बालाजीराव कल्याणकर, आ.श्रीजयाताई चव्हाण, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ.आनंदराव तिडके बोंढारकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, डॉ.सचिन पाटील उमरेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील नायक यांच्यासह सर्व विभागाच्या विभाग प्रमुखांसह अनेक अधिकाऱ्यांची उपस्थिती होती









## मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन, शेकाप नेते तथा पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: स्व. महेंद्र आमोलकचंदजी बांठिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ पनवेल मधील श्री जैन श्वेतांबर स्थानक ट्रस्ट, जायंटस् ग्रुप ऑफ पनवेल, निओ क्लिनिक व इको सेंटर, रोटरॅक्ट क्लब ऑफ पनवेल इलाईट, आनंद धार्मिक ग्रुप, इनरव्हिल क्लब ऑफ न्यु पनवेल,मिनी फर्निशिंगस् यांच्या सहयोगाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला शेकाप नेते तथा पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली. या शिबीरासाठी तज्ञ डॉ. निलेश बांठिया, डॉ.अंकिता लोखंडे, डॉ.मंदार शहा, डॉ.कश्यप ठक्कर, यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीरात मोफत चाचण्या करण्यात आल्या. सामाजिक बांधिलकीतून वरील सर्व सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचा नक्कीच गरजवंतांना लाभ होईल जेणेकरून भविष्यात उद्भवणाऱ्या आजाराला टाळण्यासाठी त्यांना मदत मिळेल. स्व. महेंद्रशेठ बांठिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ सर्वांनी एक समाजाला चांगला आदर्श दिला त्याबद्दल प्रीतम म्हात्रे यांनी त्यांचे आभार मानले.



# नियोजन आणि जवाबदारीपूर्वक प्रयत्न हेच यशाचे खरे सूत्र – जिल्हा पोलिस अधीक्षक – अनुज तारे

**दैनिक युवक आधार**
**रिसोड वार्ताहर**
**. रणजीत सिंह ठाकुर**

**वाशिम** : दि. 28, स्थानिक श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय आणि श्री. शिवाजी अध्यापक विद्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भविष्यातील यश हे वर्तमानातील तयारीवर अवलंबून असते, त्यामुळे व्यक्तीने नियोजन करून जवाबदारीपूर्वक केलेले प्रयत्न कोणत्याच क्षेत्रात अपयश येऊ देत नाही. असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी केले. यावेळी स्वागत गीताने श्रद्धा मुसळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करणे आणि त्यांना योग्य दिशा देणे हा होता. प्रमुख अतिथी श्री. अनुज तारे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन



केले. 'करियर म्हणजे फक्त स्पर्धा परीक्षा' नसून करियर या विषयाची व्यापकता त्यांनी स्पष्ट केली. केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोग यांच्या मार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षा, विविध क्षेत्रातील स्टार्ट अप, उद्योजगता, सी.एस. आर, संरक्षण क्षेत्र आणि तत्सम क्षेत्रांविषयी विस्तृत माहिती दिली. ध्येयाचा पाठलाग करतांना आपली आवड आणि कौशल्य या आधारित क्षेत्र व विषयांची निवड, समाजमाध्यमांचा योग्य व मर्यादित वापर, चौफेर वाचन हा यशाचा मूलमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अड. किरणराव सरनाईक यांनी विद्यार्थ्यांना करियर निवडीमध्ये सहाय्य व्हावे तसेच त्यांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश विशद केला तसेच श्री. शिवाजी शिक्षण संस्थेने प्रशासकीय अधिकारी घडविण्यात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशावर भर न देता सामाजिक जाणिवा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन केले. भारतीय पोलीस दलातील अतुलनीय कामगिरीबद्दल भारत सरकारने श्री. अनुज तारे यांना शौर्य पुरस्काराने सन्मानित केले होते. त्या निमित्ताने श्री. शिवाजी शिक्षण संस्था, वाशीम च्या वतीने त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. समाजकार्य महाविद्यालयातील वैष्णवी हारके, पूजा राठोड, वैष्णवी कुकडे, अभय गवळी, कल्याणी धाराशिवकर तसेच जिल्हा युवा पुरस्कार विजेते आकांक्षा गायकवाड, प्रदीप पट्टेबहादूर आणि अध्यापक विद्यालयातील मनिषा ठाकरे, पूनम गावंडे, पूजा मोरे यासर्व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अरुण सरनाईक, संचालक डॉ. स्नेहदीप सरनाईक, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय साळीवकर, अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य प्रा. सारिका खुरसडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सृष्टी जाधव व वैष्णवी रणबावळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. मंगेश भुताडे आणि आभार प्रदर्शन प्रा. सारिका खुरसडे यांनी केले. कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिक्षण क्षेत्रात विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल

## - कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचा (स्वायत्त) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि दर्पण २०२४-२५ सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे , पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, संजय भगत, प्रकाश भगत, एम. पी. ए. एस. सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



गणेश ठाकूर आदी मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती या सोहळ्याला लाभली. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे डॉ. रत्नप्रभा म्हात्रे संपादित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जीवनपटावरआधारित"जिज्ञासा" या २७ व्या लघुअंकाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमामध्ये एन.सी.सी. च्या पथकाने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. या सोहळ्याची सुरुवात सुरेल राज्य गीताने झाली. त्यानंतर प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. तसेच प्रमुख पाहुण्यांची ओळख इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी करून दिली. यानंतर प्राचार्यांनी आपल्या भाषणामध्ये महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. त्यानंतर महाविद्यालयातील क्रीडा, कला, संशोधन , सेवा क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी विभागीय, विद्यापीठीय , राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर दैदिप्यमान यश प्राप्त केले अशा विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार विविध मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आला. तसेचमहाविद्यालयातीलशैक्षणिक पात्रता वृद्धिंगत करणारे प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना सुद्धा सन्मानित करण्यात आले.त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नृत्य, गायन, आणि अभिनय यांचा कला संगम असणारा दर्पण २०२४-२५ हा कार्यक्रमसुद्धा मोठ्या दिमाखात साजरा करण्यातआला. या कार्यक्रमामध्ये प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाला नॅक तर्फे A++मुल्यांकन प्राप्त झाल्याबद्दल प्राचार्य, विद्यार्थी, शिक्षक, यांचे भरभरून अभिनंदन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना उदेशून सांगितले कि "मानव अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून विज्ञानाकडे आणि आत्ता विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल करत आहे म्हणून या तंत्रज्ञानाअंतर्गत शिक्षकांनी एआय प्रणाली चा वापर शैक्षणिक क्षेत्रात केला पाहिजे", असे आपल्या मार्गदर्शक भाषणातून सांगितले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विविध क्षेत्रात अशीच प्रगती करा आणि महाविद्यालयाचे नाववृद्धींगत करा आणि माजी विद्यार्थी झाले तरी महाविद्यालयाची आठवण ठेवा असे संबोधिले.या सोहळ्याचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. गीतिका तंवर यांनी केले. प्रा. डॉ.आर. व्ही.येवले, प्रा. ए. व्ही. पाटील आणि प्रा. डॉ. गीतिका तंवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दुसऱ्या सत्रात दर्पण २०२४-२५ या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मनोरंजक व भाषण तज्ञ आणि लेखक संजीवन म्हात्रे यांची अतिथी म्हणून विशेष उपस्थिती लाभली. त्याचबरोबर प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रो.डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो.डॉ.एस.बी.यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ.जे. एस.ठाकूर आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर आदी मान्यवर उपस्थित होते. संजीवन म्हात्रे यांनी आपल्या भाषणात मोबाईलचा वापर सुयोग्य करायचा कि अयोग्य करायचा हे आपल्या हातात आहे, असे विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले तसेच त्यांनी स्टँडअप कॉमेडी प्रदर्शित केली. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक गणेश जगताप, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर आणि विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक डॉ.मंदा म्हात्रे व इतर सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.

# .. तुळजापूर तालुक्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील अखेर खरे बोलले.

.
**दैनिक युवक आधार**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**







नळदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्ग बायपास एकेरी पदरी वहातुक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे माजी उप जिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण शहर प्रमुख संतोष पुदाले माजी नगरसेवक बसवराज धरणे विलास येडगे सोमनाथ म्हेत्रे राजू ठाकूर व पत्रकार बंधू यांच्या हस्ते दि. २७ जानेवारी रोजी बायपास रस्त्याची पूजा करून सोलापूर ते हैदराबादकडे जाणाऱ्या वाहनास हिरवा झेंडा दाखवून वाहतूक चालू करण्यात आले परंतु भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांना याची फार मिरची लागली करण त्यांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ जानेवारीला आमदार राणादादा पाटील यांना नळदुर्ग ला बोलून परत सदरील बायपासचे नारळ फोडून झालेल्या रस्त्याच्या परत उद्घाटन करण्यात आले वास्तविक पाहता शिवसेना नेते कमलाकर चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील गेल्या ४ ते ५ वर्षापासून बायपास रस्ता लवकर चालू व्हावे म्हणून अनेक आंदोलने केली एवढेच नव्हे तरी २४ दिवस टोल बंद केला ज्या कंपन्या काम करत नव्हती त्या कंपन्याला बदलून दुसऱ्या कंपनीला काम देण्याचे काम कमलाकर चव्हाण यांनी भाग पाडले तेवढेच नव्हे तरी नळदुर्ग शहरातील चार चाकी वाहनास संपूर्ण टोलमुक्त माफ करून घेतले शिवसेनेचे वेळोवेळी आंदोलन व दबावतंत्र त्यामुळेच बायपासचे काम लवकर झाले हे वास्तव सत्य संपूर्ण नळदुर्ग वासियांना माहिती आहे असे असताना झालेल्या रस्त्याचे उद्घाटना आमदाराचे हस्ते डबल उद्घाटन करून भाजपवाल्यांना काय साध्य केले हे त्यांनाच माहिती पण हे मात्र खरे की सदरील कार्यक्रमात पत्रकारांनी विचारल्या प्रश्नाला उत्तर देताना आमदार म्हणले मी विरोधकामुळेच निवडून आलो हे मात्र आमदाराने सत्य बोलले कारण लोकसभेत मिळालेल्या यशामुळे आम्ही विधानसभेला गाफील राहिलो आमचे जागावाटप फॉर्म भरायच्या शेवटच्या दिवशी पर्यंत चालेला त्यामुळे आम्हाला प्रचाराला वेळ मिळाला नाही म्हणून युद्धात व राजकारणात गाफील पणा चालत नसतो त्यामुळे शत्रू पक्षाचा विजय होतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आमदार राणा दादा पाटील

# वरळीकरांचा जीव धोक्यात!

## पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयाच्या टाकीवर दारुडे, गर्दुल्ले आणि प्रेमी युगुलांचा उच्छाद

**पूनम पोळ / मुंबई**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या वरळी येथील पाण्याच्या टाकीची सुरक्षा धोक्यात आली आहे. या टाकीच्या परिसरात दिवसाढवळ्या गर्दुल्ले, दारुडे आणि प्रेमीयुगुलांचा वावर असल्याने या परिसराची सुरक्षा रामभरोसे झाली आहे.

दारुडे आणि गर्दुल्ल्याच्या उच्छादामुळे जलकुंभाची सुरक्षा धोक्यात आली आहे. दरम्यान टाकीच्या संरक्षणासाठी असलेले सुरक्षाकर्मचारीही संपूर्ण परिसरात कुठे दिसत नाहीत. त्यामुळे भविष्यात एखादी अघटित घटना घडली तर या टाकीतील पाण्यामुळे वरळीकरांचा जीव धोक्यात येऊ शकतो.

वरळी येथील बी. जी. खेर मार्गावरील टेकडीवर मुंबई महापालिकेच्या मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या लाखो लिटरच्या दोन पाण्याच्या टाक्या उभारण्यात आल्या आहेत. या पाण्याच्या टाक्यांमधून दक्षिण मुंबईत पाणी पुरवठा केला जातो.

१.५ दशलक्ष लिटर इतका पाणीसाठा एका टाकीत आहे. मुंबईकरांच्या आरोग्याच्या आणि जीविताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या पाण्याच्या टाकीची सुरक्षा मात्र रामभरोसे आहे.

या ठिकाणी तीन शिफ्टमध्ये एकूण ९ सुरक्षारक्षक आहेत. मात्र, प्रत्यक्ष जागेवर एकही जण दिसत नाही. तशी नोंद पालिकेच्याच वरिष्ठानी नोंदवहीत केलेली आहे. तर आमच्यावर यापूर्वी दारुडे आणि गर्दुल्ल्यांकडून हल्ले झाले आहेत. याची माहिती प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही दिली आहे. परंतु त्यांच्याकडूनही सुरक्षेबाबत कोणत्याच उपाययोजना राबवल्या जात नाहीत. त्यामुळे आम्ही जीव मुठीत घेऊन आपले कर्तव्य पार पडत आहोत. वेळप्रसंगी इमारतीच्या गेटला टाळा अडकवून काम करतो, अशी माहिती पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी दिली. शहरात अंमलीपदार्थ बाळगणे व त्याच्या सेवनाच्या घटना गेल्या काही दिवसांपासून वाढल्या आहेत.



### भिंतीशिवाय सुरक्षा नाहीच

संवेदनशील असलेल्या परिसरात बाहेरील व्यक्ती प्रवेश करू नये यासाठी संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे. सातत्याने याबाबत पाठपुरावा करीत आहोत. मात्र काही झोपड्या त्यासाठी हटवाव्या लागत असल्याने संरक्षक भिंतीचे काम रखडले आहे. परिसरात सीसीटीव्ही सगळीकडे नाहीत, सीसीटीव्ही लावले तरी ते फुटणार नाहीत याची खात्री नाही. बाहेरील नागरिकांचा या ठिकाणी नेहमीच धुडगूस असतो. संरक्षक भिंत बांधणे हाच त्यावरचा एक उपाय आहे. अवैध कृत्य करणाऱ्यांना मज्जाव करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याच्याही घटना घडल्या आहेत, अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्याने नाव न घेण्याच्या अटीवर दिली.

### पाण्याच्या टाकीचे वॉल उघडे

टाकीच्या कंपाउंडला लागून असलेल्या अचानक नगर या झोपडपट्टीतील नागरिकांनी या परिसराची कचराकुंडी केलेली पाहायला मिळते. या ठिकाणी झाडे-झुडपे जास्त असल्याकारणाने येथील नागरिक येथे लाकडे गोळा करण्यासाठी येतात. आणि याच ठिकाणी पाण्याच्या टाकीचे दोन उघडे वॉल आहेत. बाजूला सरकवलेली छोटी फरशी ज्याचा वापर इथली मुले क्रिकेटचा स्टॅम्प म्हणून करतात. अशा वेळेस जर कोणीही काही पाण्यात मिसळण्याचा प्रयत्न केला तर संपूर्ण वरळीकरांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता आहे.

### भरदिवसा भरतात दारुचे अड्डे



या परिसरातील जागेवर अतिक्रमन केलेल्या बाजूच्या झोपडपट्टीतील अनेक तरुण व नागरिक भरदिवसा, पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमोर दारू पित बसलेले असतात. तर काही तरुण अमली पदार्थाचे सेवन करताना दिसतात. काही वयोवृद्ध नागरिक पालिकेने घोषित केलेल्या संवेदनशील क्षेत्र जलाशय क्रमांक १ च्या पायऱ्यांवर गमजा मारत मद्यपान करतात. मात्र, हे पाहायला पालिकेचा एकही कर्मचारी या भागात उपलब्ध नसतो.

### शुद्ध पाण्याचा पालिकेचा दावा

मुंबई पालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेपैकी जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टरमध्ये बिघाड झाल्याने फिल्टर न करता पाण्याचा पुरवठा होत असल्याचे संदेश समाजमाध्यमांद्वारे प्रसारित होत आहे. मात्र पालिकेने समाजमाध्यमांवरील या संदेशाना खोटे आणि दिशाभूल करणारे असल्याचे सांगितले आहे. तसेच मुंबईकरांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पालिकेतर्फे दररोज ४ हजार दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. पाणीपुरवठा करताना, जागतिक आरोग्य संघटना आणि आयएसओ १०५००-२०१२ने प्रमाणित केलेल्या मानकांनुसारच जलशुद्धीकरण प्रक्रिया केली जाते. मुंबईकरांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात असल्याचा दावा आहे.

### अनेकांची पाण्यासाठी वणवण - ठाकरे

करदात्या मुंबईकरांना सोयीसुविधा उपलब्ध करून देणे मुंबई महापालिकेचे कर्तव्य आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून मुंबईतील अनेक भागात अपुरा पाणीपुरवठा, तर काही भागात पाणीच येत नाही. तर ज्या भागात पाणीपुरवठा होतो तो दूषित. मुंबईला शुद्ध व सुरळीत पाणीपुरवठा कधी होणार याबाबत पालिका प्रशासनाकडे अनेकदा विचारणा केली. मात्र अद्याप उत्तर दिलेले नाही. मुंबई महापालिका मुंबईकरांसाठी काम करते की राज्यातील महायुती सरकारसाठी असा सवाल युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

# विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना हायकोर्टाची तंबी

## आदेशाचे पालन करा अन्यथा तुरुंगात जाल

**मुंबई** : वैद्यकीय उपचाराचे पैसे देण्यास वेळकाढूपणा करणाऱ्या ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला उच्च न्यायालयाने फैलावर घेतले. न्यायालयीन आदेशाचे काटेकोर पालन करा, विमाधारकांना त्यांच्या वैद्यकीय उपचाराचे पैसे देण्यास टाळाटाळ करू नका. आदेशाचा अवमान केल्यास संबंधित अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा दम न्यायालयाने दिला.

न्यायमूर्ती बी. पी. कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोष पुनीवाला यांच्या खंडपीठाने विमा कंपनीच्या मनमानी कारभारावर कडक शब्दांत ताशेरे ओढताना ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना तंबी दिली. तसेच आदेशाचे पालन करण्यास ही शेवटची संधी देत असल्याचे स्पष्ट करून खंडपीठाने याचिकेची सुनावणी ३ फेब्रुवारीपर्यंत तहकूब केली.

विमा लोकपालांनी देढिया यांच्या बाजूने निर्णय देत कंपनीला त्यांच्या उपचाराचे पैसे देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला विमा कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावेळी उच्च न्यायालयाने कंपनीची याचिका डिसेंबर महिन्यात फेटाळली होती. न्यायालयाने कंपनीला पुढील महिन्याभरात देढिया यांना वैद्यकीय उपचाराचे पैसे देण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाचे कंपनीने पालन न केल्याचे याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. असीम नाफडे व ॲड. निष्ठा मलिक यांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिली. त्याची दखल न्यायमूर्ती कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोष पुनीवाला यांच्या खंडपीठाने ताशेरे ओढले.

# शरीफुलला न्यायालयीन कोठडी

**मुंबई** : अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद राहिल्ला अमीर फकीर याला बुधवारी वांद्रे येथील स्थानिक न्यायालयाने चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. पोलिसांच्या वतीने सरकारी वकिलांनी त्याच्या पोलीस कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ मिळावी यासाठी विनंती केली. विनंती फेटाळून न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली. काही दिवसांपूर्वी शरीफुल हा सैफअलीच्या वांद्रे येथील फ्लॅटमध्ये चोरीच्या उद्देशाने घुसला होता. मात्र त्याचा प्रयत्न फसल्यानंतर त्याने सैफवर चाकूने हल्ला केला. पळून गेलेल्या शरीफुलला चार दिवसांनी ठाण्यातून अटक केली. तेव्हापासून तो पोलीस कोठडीत होता. कोठडीची मुदत संपत असल्याने त्याला वांद्रे येथील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते.

**सैफ अली खान हल्ला प्रकरण**

# 'आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे'

**मुंबई** : अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला करणार्‍या शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद राहिल्ला अमीर फकीर याच्याविरुद्ध भक्कम पुरावे असल्याचे दावा अतिरिक्त पोलीस आयुक्त परमजीत-सिंह दहिया यांनी केला आहे. तसेच फिंगरप्रिंटचा अहवाल अद्याप पोलिसांना प्राप्त झाला नाही अशी माहिती दहिया यांनी दिली.

दहिया यांनी सांगितले की, शरीफुलविरुद्ध वांद्रे पोलिसांकडून भक्कम पुरावे आहे. तो बांगलादेशी नागरिक आहे. त्याच्या बांगलादेशी नागरिकत्त्वाबाबत काही दस्तावेज सापडले आहे. या गुन्ह्यांचा वांद्रे पोलिसांसह गुन्हे शाखेने योग्य तपास केला आहे. शरीफुलकडून गुन्ह्यांतील कपडे, चाकूचा तुकडा तसेच इतर साहित्य जप्त केले असून ते फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठविण्यात आले आहे. सैफ अलीच्या फ्लॅटमध्ये सापडलेले आणि आरोपी शरीफुल फिंगरप्रिंट मॅच झाला नसल्याचे काही वृत्त प्रसिद्ध झाले आहे, या वृत्ताचे दहिया यांनी खंडन केले.

## कारखाना कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे शेतकरी कृती समितीची मागणी

### संचालकासह एकावर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- प्रतिनिधी**

दि.२९रोजी भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालकाने कारखान्याच्या शेतकी विभागातील एका कर्मचाऱ्याची कॉलर पकडून त्याला मारहाण व शिवीगाळ केली. दरम्यान,सर्व कर्मचाऱ्यांनी एकजुटीने या प्रकरणाचा निषेध करत काम बंद आंदोलन करण्याचा पवित्रा घेऊन संचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारखान्याच्या बेलवाडी कार्यक्षेत्रातील एका विद्यमान संचालकाने केलेल्या या प्रकारामुळे सर्व सभासद व कामगारांमधून चिड उत्पन्न होत आहे.कारखाना हा सभासदांच्या मालकीचा असून संबंधित कामगारही सभासद आहे.मात्र,आपला स्वतःचा खोडवा ऊस तोडण्यासाठी शिवीगाळ करत,कॉलर पकडून मारहाण करण्यापर्यंत या संचालकाची मजल गेल्याने याविषयी परिसरातून संताप व्यक्त होत आहे.कारखाना सुस्थितीत चालवण्याची जबाबदारी संचालक मंडळावर असते.मात्र,संचालकांनी स्वतःचा खोडवा ऊस तोडण्यासाठी केलेला कारनाम्याची परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.मागील महिन्यातही कारखान्याच्या शेतकी विभागातीलच प्रमुख अधिकाऱ्यास अशा प्रकाराला सामोरे जावे लागले होते.मात्र, आता कर्मचारीही सुरक्षित नसल्याची भावना कामगारांमधून उमटत आहे.दरम्यान,शेती कार्यालय आंदोलन सुरू केले आहे.संबंधित संचालकांवर वालचंदनगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला असून,यापुढे कोणत्याही कामगारावर अशी वेळ येऊ नये,अशी मागणी शेतकरी कृती समितीचे सदस्य विशाल निंबाळकर यांनी कारखाना अध्यक्ष,कार्यकारी संचालकांकडे केली असून सदर गुन्ह्याचा तपास वालचंदनगर पोलीस स्टेशनचे हेडकॉस्टेबल उत्तम खाडे करत आहेत.

# पालिका रुग्णालयांत आणीबाणी?

## थकीत रकमेसाठी पुरवठादारांचा औषध बंदचा इशारा



**मुंबई** : औषध पुरवठादारांच्या १२० कोटी रुपयांपैकी ५० टक्के रक्कम दोन आठवड्यांत देण्यात येईल, असे आश्वासन पालिका प्रशासनाने दिले होते. मात्र दोन आठवडे उलटले असून फक्त ५ ते १० टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे औषध पुरवठादारांची आर्थिक कोंडी कायम आहे. पालिका प्रशासनाने बिलाचे पैसे द्यावे यासाठी औषध पुरवठादारांची बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीत औषध पुरवठा बंद करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे ऑल इंडिया ड्रग्ज सप्लायर्स असोसिएशनचे अध्यक्ष अभय पांडे यांनी सांगितले.

**आज बैठकीत घेणार निर्णय**

केईएम, नायर, सायन, कूपर ही मुंबई पालिकेची मोठी रुग्णालये असून १६ उपनगरीय रुग्णालयांचा समावेश आहे. तसेच २८ प्रसुतीगृह, १०० आरोग्य केंद्र व १०७ आपला दवाखाना आहेत. या सगळ्या ठिकाणी रोज लागणाऱ्या औषधांसह शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याचा पुरवठा ४०० औषध वितरकांच्या माध्यमातून मुंबई पालिकेच्या रुग्णालयात होतो. मुंबईसह महाराष्ट्रात हे ४०० औषध वितरक औषधे निर्मिती करणाऱ्या कंपनीकडून औषध खरेदी करतात. त्यानंतर राज्य सरकार व मुंबई पालिकेच्या रुग्णालयात औषधे पुरवठा करतात. मात्र औषध पुरवठा केल्यानंतरही पालिका प्रशासनाने १२० कोटी रुपये बिलापोटी थकवले होते. बिलाचे पैसे अडकल्याने औषध पुरवठादारांची आर्थिक कोंडी झाली. पालिका प्रशासनाने बिलाचे १२० कोटी रुपये द्यावे यासाठी १५ दिवसांपूर्वी पालिका रुग्णालयात औषध पुरवठा बंद केला होता. मात्र रुग्ण सेवेवर परिणाम होत असल्याने पालिका प्रशासनाने १५ दिवसांत ५० टक्के रक्कम देणार असल्याचे मान्य केले. मात्र १५ दिवस उलटल्यानंतर फक्त ५ ते १० टक्के रक्कम अदा केली आहे. पालिकेच्या वेळकाढूपणामुळे औषध पुरवठादारांनी संताप व्यक्त केला असून पुन्हा एकदा औषध पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवारी बैठक होणार असून बैठकीत पुढील निर्णय घेण्यात येईल, असे पांडे यांनी सांगितले.

### पुढील दोन आठवड्यांत थकबाकी देणार

औषध पुरवठादारांची संपूर्ण थकीत देणी १५ फेब्रुवारीपर्यंत देणार असल्याचे आश्वासन पुरठादारांना याआधीच देण्यात आले आहे. यानुसार थकीत देणी देण्याची कार्यवाही सुरू आहे. यासाठी पुरवठादारांनी केलेल्या औषध पुरवठ्याचा आढावा घेऊनच हे पैसे दिले जात आहेत. त्यामुळे पुरवठादारांनी सामंजस्याची भूमिका घेत औषध बंदीचा निर्णय घेऊ नये, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

## सणसर येथे भारत कुष्ठरूग्ण शोध अभियान पंधरावडा उपक्रमास सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गुरुवार दिनांक 30/1/2025 पासून 14/2/ 2025 पर्यंत या कालावधीत पंधरावडा कुष्ठरूग शोध अभियान सुरु करण्यात आले आहे.तरी भारतामध्ये 2027 पर्यंत कुष्ठरूग्ण मुक्त भारत करण्यात येणार आहे तरी गुरुवार पासून होणाऱ्या या अभियानास सणसर प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत परिसरात राबविला जाणार आहे.या उपक्रमावेळी डॉ.प्राजक्ता देवकर यांनी सणसर परिसरातील नागरिकांना आपल्या जवळचे कोणी असे रुग्ण,नातेवाईक,मित्र असल्यास प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करून तातडीने उपचार करून घ्यावेत म्हणून अशी विनंती करण्यात आली. तरी या कार्यक्रमांमध्ये सणसर प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर चे वैद्यकीय अधिकारी डॉ.पंकज पाटील डॉ.प्राजक्ता देवकर मॅडम व समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. इंद्रजीत अष्टेकर व आरोग्य निरीक्षक श्री.अशोक कमळे साहेब, श्री.इर्षा सोलापुरे लॅब टेक्निशियन कु.संध्या लोंढे आरोग्य सेविका श्रीमती अरुणा कामथे स्टाफ नर्स श्रीमती ललिता पोरे आरोग्य सेवक श्री सतीश कांबळे आरोग्य सेवक प्रशांत काकडे स्त्री परिचर श्रीमती माधुरी मिसाळ आणि ग्रामस्थ उपस्थित होते.




## मराठी हौशी रंगभूमीवरील एक अवलीया पडद्याआड झाला

**दैनिक युवक आधार**



अर्धांगवायूच्या तीव्र झटक्याने आजारी झाले असलेले मराठी हौशी रंगभूमीवरील एक हरहुन्नरी नट - अमर अनिरुद्ध पडवळ ( रत्नागिरी - पडवणेवाडी या गावातील ) हा कलावंत गेली पाच वर्षे अर्धांगवायूने अंथरूणास खिळला होता परंतु नाट्यकलेची आवड असल्याने जुन्या नाटकांची परंपरा आणि आठवणी व स्वतः ज्या ज्या नाटकात काम केले होते त्याची तो मला आठवण सांगत असे अन् ती आठवण अशी काही रंगवून सांगत असे की जणू काही प्रत्यक्ष नाटक पाहत असल्या सारखे मनी वाटे! कमलाकर बोरकर लिखित - दैवजाणिले कुणी ?, वैंकोजी वाघ,साक्षात्कार, शिकलेली बायको, ललाटरेषा, गणेश हिर्लेकर लिखित - कट्टर वैरी, देव्हारा, जिव्हाळा. मदन राजवाडकर लिखित - लग्नाआधी वरात.सु.बा.सरपडवळ लिखित - साथ जन्मातरीची.बाळ कोल्हटकर लिखित - एखाद्याचं नशीब. इत्यादी लेखकांच्या नाटकातून विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी आपल्या अंगिक अभिनयातून साकारल्या आहेत.... परंतु नुकतेच बुधवार दिनांक - २२ जानेवारी २० २५ रोजी त्यांच्यावर काळाने झडप घातली आणि एक हरहुन्नरी नट आमच्यातून हिरावून नेला हि घटना आमच्या रंगकर्मी मनाला खूप दुखवणी आहे! ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना ! शुक्रवार दिनांक- ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता पडवणेवाडीत दशक्रिया विधी आहेत तर बारावे/ तेरावे विधी त्यांच्या राहत्या घरी -पडवणेवाडी येथे रविवार दिनांक -फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी - १२ वाजता आहेत! तरी ज्ञात बांधव, मित्र मंडळीनी याची नोंद घ्यावी....

**सु. बा. सरपडवळ, नाट्यसमीक्षक.**

# पालिकेच्या ३० प्रसूतिगृहांचे सोशल ऑडिट होणार

## मुंबई उच्च न्यायालयाने स्थापन केली आठ सदस्यीय समिती

**मुंबई** : मुंबई महापालिकेमार्फत चालवल्या जाणाऱ्या ३० प्रसूतिगृहांचे सामाजिक लेखापरीक्षण (सोशल ऑडिट) करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी आठ सदस्यांची समिती स्थापन केली. समितीमध्ये केईएम, टाटा इन्स्टिट्यूटमधील तज्ज्ञांचा समावेश आहे.

गेल्या वर्षी भांडुप पश्चिमेकडील सुषमा स्वराज प्रसूतिगृहात २६ वर्षीय महिला व तिच्या नवजात बाळाचा मृत्यू झाला. प्रसूतिगृहाच्या निष्काळजीपणामुळे दोघांचा मृत्यू झाल्याचा आरोप करून महिलेचा पती खुसरुद्दीन अन्सारीने चौकशीची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेवर बुधवारी न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी याचिकाकर्त्या अन्सारीच्या वतीने ज्येष्ठ वकील गायत्री सिंह यांनी पालिकेच्या रुग्णालयाने निष्काळजीपणा आणि गैरवर्तन केल्याचा आरोप करताना पालिका रुग्णालयांतील प्रसूतिगृहांचे सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी समिती नेमण्याची विनंती केली. तसेच आठ सदस्यांपैकी सहा सदस्यांची नावे सुचवली. त्या नावांना रुग्णालय आणि पालिकेच्या वकील पूर्णिमा कंथारिया यांनी सहमती दर्शवली. समितीच्या सदस्यांच्या नावांवर आपला कुठलाही आक्षेप नसल्याचे कंथारिया यांनी कळवले. समितीमध्ये सरकारी रुग्णालयांमधील दोन डॉक्टरांचा समावेश करण्याचेही त्यांनी सुचवले. त्यानंतर न्यायालयाने आठ सदस्यीय समिती स्थापन केली आहे.



### समितीमध्ये या सदस्यांचा समावेश

समितीमध्ये केईएम रुग्णालयातील कम्युनिटी मेडिसिनच्या निवृत्त प्राध्यापक डॉ. कामक्षी भाटे, केईएम रुग्णालयातील स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख डॉ. पद्मजा, कूपर स्त्रीरोग विभागाच्या प्राध्यापक डॉ. रीना वाणी कूपर, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (टीआयएसएस) येथील आरोग्य व मानसिक आरोग्य केंद्राच्या अध्यक्षा ब्रिनेल डिसूझा, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या उपाध्यक्षा सोन्या गिल, आरोग्य व महिला हक्कांच्या वकिल संगीता रेगे यांचा समावेश आहे. याशिवाय नायर आणि जे. जे. हॉस्पिटलमधील दोन डॉक्टरांचा समितीमध्ये समावेश असेल.